जी.एस.टी. कर प्रणाली लागू झाल्यानंतर सुरवातीच्या काळात जनतेमध्ये या नव्या बदलाविषयी बरेच संभ्रम व अज्ञान होते. परिणामी लोकांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता तो दूर करून आर्थिक साक्षरतेच्या कार्यात आपले योगदान देण्याच्या हेतूने आपल्या बँकेने जी.एस.टी. कार्यशाळांचे आयोजन केले. चिखली येथील मुख्यालयाच्या वतीने सहकारी पतसंस्थांचे संचालक व कर्मचारी आणि व्यापारी व नागरिकांसाठी वेगवेगळ्या कार्यशाळा घेण्यात आल्या. अंकेक्षक व कर सल्लागार अश्या तज्ञ व्यक्तींनी या कार्यशाळेतून केलेल्या मार्गदर्शनामुळे संबंधितांचे शंका निरसन होऊन संभ्रम देखील नाहीसा झाला. असाच प्रयोग बँकेने अन्य शाखांमधून देखील करून एका महत्वाच्या राष्ट्रीय कार्यात आपला सहभाग नोंदवला. तसेच ग्राहकांना प्रशिक्षीत केले हे आवर्जुन सांगावेसे वाटते.

समाजात पत नसलेल्या परंतु काही तरी करण्याची उमेद बाळगणाऱ्या प्रत्येकासाठी चिखली अर्बन बँकेचा मदतीचा हात सैदव पुढेच असतो. हीच भूमिका ठेवून आपल्या बँकेने एक नवे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र शासनाशी करार करून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज योजनांची अंमलबजावणी आपली बँक करीत आहे. अश्या प्रकारे राज्य सरकारशी करारबध्द होऊन काम करणारी महाराष्ट्रातील आपली पहिलीच नागरी सहकारी बँक असल्याची बाब येथे उल्लेखनीय आहे. दि चिखली अर्बन को-ऑप.बँक लि.चिखली आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना व गट प्रकल्प योजना या तीन कर्ज योजनांच्या द्वारे अर्थसहाय्य करण्यात येत आहे. कृषीसंलग्न व पारंपारिक व्यवसाय, लघु व मध्यम उद्योग (उत्पादन, व्यापार व विक्री) आणि सेवा क्षेत्र (संगणक विक्री-सेवा) यासह महिला स्वयंसहाय्यता बचतगटांसाठी या माध्यमातून कर्ज पुरवठा केला जातो. बँकेच्या सर्व शाखांमधील व्यावसायीक, लहान-मोठे उद्योजक, सुशिक्षीत बेरोजगार व स्वयंरोजगार करणाऱ्या महिला या योजनांचा लाभ घेऊन आपला व्यवसाय वाढवून आर्थिक उन्नती साधतील अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.